


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक १९३ ●रविवार, दि.१२ ऑक्टोबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955






# प्रामाणिक आणि निष्ठावंतांनाच संधी देणार: आ.संदीप क्षीरसागर

● बीड नगर पालिकेत नगराध्यक्ष आणि सर्व जागेवर नगरसेवक निवडून आणणार
● पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या बैठकीत व्यक्त केला विश्वास
● बैठकीला हजारो पदाधिकाऱ्यांची आणि कार्यकर्त्यांची उपस्थिती

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगर पालिकेच्या निवडणुकीत आपलाच उमेदवार नगराध्यक्ष म्हणून निवडून येणार असा विश्वास आ.संदीप क्षीरसागर यांनी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या बैठकीत व्यक्त केला.

आगामी बीड नगर पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दि.११ (शनिवार) रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) च्या वतीने आ.संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील सर्व कार्यकर्त्यांची आणि पदाधिकाऱ्यांची महत्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला मोठी गर्दी पाहावयास मिळाली. हजारोच्या संख्येने कार्यकर्ते, पदाधिकारी आणि इच्छुक उमेदवार उपस्थित होते. या बैठकीत आ. संदीप क्षीरसागर यांनी कार्यकर्त्यांना नगर परिषद निवडणुकी संदर्भातील संघटनात्मक तयारी, उमेदवार निवड प्रक्रिया, प्रचार आराखडा आणि पक्ष बळकटीकरण यावर मार्गदर्शन केले.

यावेळी बोलताना म्हणाले की, अतिवृष्टीच्या पावसामुळे अनेक ग्रामीण भागात नुकसान झाल्यामुळे नगर पालिकेची निवडणूक अगोदर होणार आहे. येणाऱ्या निवडणुकीत विरोधक जातीचे राजकारण करतील. त्यांना न जुमानता जोमाने कामाला लागा. लोकांना काम करून दाखवायचे आहे. लोकांचे काम केले तर लोक डोक्यावर घेतील. लोकांशी संवाद साधून त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी तत्पर रहा. प्रत्येक वॉर्डात कार्यकर्त्यांनी समस्या सोडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला पाहिजे. येणाऱ्या नगर पालिकेच्या निवडणुकीत पक्ष प्रामाणिक आणि निष्ठावंतांनाच संधी देणार असल्याचे

▶▶ उर्वरित पान २ वर

**● कोणत्याच प्रभागामध्ये साखळी तुटता कामा नये : आ.संदीप क्षीरसागर**

**शहरातील कोणत्याच प्रभागामध्ये साखळी तुटली नाही पाहिजे. साखळी जर तुटली नाही तर नगर पालिका आपल्याच ताब्यात येणार. जर का कोणी उमेदवार साखळी तोडून गेला तर लोकांना तो माझा उमेदवार नाही असे सांगेल. साखळी तोडणाऱ्याला निवडणुकीत धडा शिकवण्यासाठी जनताच पुढाकार घेईल असा इशारा देखील आ.संदीप क्षीरसागरांनी बैठकीत दिला.**

## उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, पालकमंत्री संजयजी शिरसाट यांच्या पुढाकाराने नवी अत्याधुनिक ॲम्बुलन्स रुग्णसेवेसाठी सज्ज

**बीड । प्रतिनिधी**

बीड, छत्रपती संभाजीनगर विभाग महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय व संवेदनशील उपमुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच सामाजिक न्याय मंत्री आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. संजयजी शिरसाट साहेब यांच्या प्रयत्नातून बीड जिल्ह्याला नवी अत्याधुनिक म्बुलन्स सेवा रुग्णसेवेसाठी उपलब्ध करून देण्यात आली.



या अत्याधुनिक म्बुलन्समुळे बीड आणि परिसरातील नागरिकांना तातडीची वैद्यकीय सेवा वेळेत मिळणार असून, ग्रामीण भागातील आरोग्यसेवेला मोठे बळ मिळणार आहे. म्बुलन्समध्ये आधुनिक जीवनरक्षक उपकरणे, ऑक्सिजन व्यवस्था, कार्डियाक मॉनिटर, स्ट्रेचर, आणि प्रशिक्षित पॅरामेडिकल कर्मचारी अशा सर्व अत्याधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. या शुभ प्रसंगी मा. उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब, मा. पालकमंत्री संजयजी शिरसाट साहेब, खासदार संदीपानजी भुमरे, आमदार प्रदीप जयस्वाल, आ. विलास भुमरे, आ. प्रा. रमेश बोरनारे, आ. संजना जाधव, शहरप्रमुख राजेंद्र जंजाळ, युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण, ऋषीकेश जयस्वाल तसेच शिवसेना पदाधिकारी, शिवसैनिक आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब म्हणाले राज्यातील प्रत्येक नागरिकाला वेळेत आणि गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा मिळावी हा आमचा संकल्प आहे. बीड जिल्ह्यातील ही अत्याधुनिक म्बुलन्स सेवा म्हणजे जनतेच्या

▶▶ उर्वरित पान २ वर

## 'फुलचंद पान' विक्री करताना पकडले

## बीड शहर पोलीसांची पहिली कारवाई

**बीड । प्रतिनिधी**

मागील काही दिवसांपासून 'फुलचंद पान' या नावाखाली विक्री होणाऱ्या पदार्थामुळे युवक व अल्पवयीन मुलांमध्ये नशेचे प्रमाण वाढत असल्याची चर्चा होत होती. या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी संबंधित बाबींचा तपास करून अशा विक्रेत्यांवर तात्काळ कारवाई करण्याचे आदेश दिले होते. या आदेशानुसार बीड शहर पोलीस ठाण्याच्या




पथकाने दिनांक १० ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी १९.१० वाजेच्या सुमारास सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स परिसरातील राज दरबार व टीम ७५ या पान टपऱ्यावर छापा टाकला असता, टपरीवर फुलचंद पान विक्री होत असल्याचे आढळून आले. तपासणीदरम्यान त्या ठिकाणी नशा निर्माण करणारे रसायनयुक्त पावडर जप्त करण्यात आले आहे. या प्रकरणात संबंधित राज दरबार पान टपरीचे अनिरुद्ध गौतम डोळसे वय २२ वर्ष राहणार गया नगर जालना रोड व पान टपरी चे मालक

▶ उर्वरित पान २ वर

## बीडमध्ये जीवघेण्या सिरपच्या ५०० बाटल्यांचा पुरवठा

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने विक्रीस बंदी घातलेल्या रेस्पिफ्रेश टीआर कफ सिरपचा साठा बीड जिल्ह्यात सापडला आहे. लहान मुलांना खोकल्यासाठी दिल्या जाणाऱ्या या सिरपमुळे मध्यप्रदेशात २० हून अधिक बालकांचा मृत्यू झाल्याने देशभरात संताप व्यक्त झाला होता. त्यानंतर शासनाने या सिरपवर तात्काळ बंदी आणली होती. मात्र तरीही बीडमध्ये या बंदी घातलेल्या सिरपच्या ५०० बाटल्या आढळून आल्याने औषध प्रशासनात खळबळ उडाली आहे.

पुण्यातील एका वितरकाकडून बीडमधील दोन एजन्सींना या सिरपचा पुरवठा झाला असून त्या एजन्सीकडून बीड शहर, आष्टी, परळी आणि गेवराई येथील मेडिकलपर्यंत तो पोहोचल्याचं समोर

▶▶ उर्वरित पान २ वर

## ससेवाडी - मोरगाव मार्गावरील पन्नास वर्षांपूर्वीचा रस्ता खुला : महसूल प्रशासनाची प्रभावी कारवाई



**तहसीलदार चंद्रकांत शेळके यांची धडाडी आणि शेतकऱ्यांविषयी असलेला कनवाळूपणा पुन्हा झाला सिद्ध**

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील ससेवाडी – मोरगाव परिसरात मागील पन्नास ते साठ वर्षांपासून बंद असलेला जुना रस्ता अखेर खुला झाला. दिनांक १० ऑक्टोबर २०२५ रोजी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली महसूल, पोलीस व

▶▶ उर्वरित पान २ वर

## प्रेयसीच्या वाढदिवसाचा केक कापला, त्याच चाकूने हत्या केली; पिंपरी चिंचवडमधील घटनेने खळबळ

**पुणे । प्रतिनिधी**

प्रियकराने प्रेयसीची हत्या केल्याच्या घटनेने एका हत्येच्या घटनेने पिंपरी चिंचवड हादरली. ज्या चाकूने प्रेयसीच्या वाढदिवसाचा केक कापला त्याच चाकूने तिची हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. हत्या केल्यानंतर आरोपी प्रियकर कोंढवा पोलीस स्टेशनमध्ये हजर झाला.



मेरी तेलगू असं हत्या झालेल्या प्रेयसीचे नाव असून दिलावर सिंह असं आरोपी प्रियकराचे नाव आहे. प्रेयसीचा वाढदिवस १० ऑक्टोबर रोजी होता.

▶ उर्वरित पान २ वर

## गुरूकुलच्या ११ विद्यार्थ्यांना मारहाण

### चालकाच्या पित्यावरही केला हल्ला, दोघाजणांविरोधात गुन्हा दाखल

**परळी । प्रतिनिधी**

शाळेमधून गुरूकुलकडे येणाऱ्या विद्यार्थ्यांना रस्त्यामध्ये अडवत परिक्षेत पेपर का बघू दिला नाही असे म्हणून दोघा जणांनी ११ विद्यार्थ्यारना बेल्ट, बुटाने जबर मारहाण करत जखमी केले. ही घटना शहरातील सिध्देश्वर नगर भागातील नर्मदेश्वर गुरूकुलात काल दुपारी घडली. विद्यार्थ्यांना उपजिल्हा रूग्णालयात दाखल करण्यात आले. विद्यार्थ्यांना




मारहाण केल्यानंतर पुन्हा गुरूकुल चालकाच्या पित्यालाही मारहाण करण्यात आली आहे. या प्रकरणी दोघा जणांविरोधात परळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. परळीच्या सिध्देश्वर नगर मध्ये अर्जुन महाराज शिंदे यांचे तीन वर्षापासून श्री नर्मदेश्वर गुरूकुल आहे. या गुरूकुलात ४२ विद्यार्थी भजन, किर्तन, मृदंगाचे शिक्षण घेवून कृष्णा नगर व गणेश पार रोडवरील शाळेमध्येही ते शिक्षण घेत आहेत. शुक्रवारी या विद्यार्थ्यांची शाळेत परिक्षा होती. परिक्षा देवून विद्यार्थी गुरूकुलाकडे जात

▶▶ उर्वरित पान २ वर

## शेतकऱ्यास कोयत्याचा धाक दाखवून लुटले; बीड ग्रामीण पोलीस आरोपीच्या शोधात

**बीड । प्रतिनिधी**

जळगावहून बीडच्या बाजार समितीमध्ये रेशीम कोष घेऊन येणाऱ्या एका व्यापाऱ्यास अज्ञात चोरट्याने अडवून त्याला कोयत्याचा धाक दाखवत खिशातील १५ हजार रुपये जबरदस्तीने काढून घेतल्याचा प्रकार जालना रोडवरील संगम हॉटेलच्या समोर घडला. या प्रकरणी अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



दीपक तुकाराम महाजन (वय ४२) वर्षे व्यवसाय शेती राहणार पातोंडा तालुका चाळीसगाव जिल्हा जळगाव हे काल रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास छत्रपती संभाजी महाराज चौकाचे पुढे बीड कुर्ला जाणाऱ्या रोडवर जात असताना त्यांना एका अनोळखी इसमाने त्यांच्या गाडीला गाडी आडवी लावून त्यांची लुटमार केल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. सध्या महाराष्ट्रात व्यापाऱ्यांच्या लुटमारीच्या अनेक मोठ्या घटना समोर आल्या असून अशीच घटना काल रात्री बीड शहरात घडली. दीपक महाजन हे बीड मध्ये रेशीम कोश विकण्यासाठी आले असता, शहरातील संगम हॉटेल पासून नवीन मोंढा रोडने रेशीम खरेदी मार्केट कडे जात असताना, छत्रपती संभाजी महाराज चौकाच्या पुढे बीड कुर्ला जाणाऱ्या रोडवर एका अनोळखी इसमाने त्यांना गाडीवर वेगात येऊन त्यांच्या इको या चारचाकी गाडीला गाडी आडवी लावत आरोपीने त्याच्या

▶ उर्वरित पान २ वर

## शेकापचा तब्बल दिड तास रास्ता रोको

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील छोटीवाडी येथे मोठीवाडी चौकात आज दिनांक ११अक्टोबर रोजी सकाळी १०:०० वा शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने भाई ड.नारायण गोले पाटील यांच्या नेतृत्वाखाली एकरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई, पुरग्रस्तांना एकरी लाख रुपये नुकसान भरपाई, संपूर्ण कर्जमाफी, १००% पिक विमा द्या, भूमिहीनांना २५ हजार रुपये सहानुभूती पर अनुदान द्या.या मागण्यासाठी तब्बल दिड तास रस्ता रोको आंदोलन करण्यात आले यावेळी आंदोलकांनी प्रचंड घोषणाबाजी केली त्यावेळी वाहनाच्या

▶ उर्वरित पान २ वर

## दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांनी स्थापन केलेला वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना सभासद ऊस उत्पादक शेतकऱ्यांना, साखर कामगारांना अंधारात ठेवून १३२ कोटी रुपयांत कवडीमोल भावात विकला !

**बीड । प्रतिनिधी**

सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, साखर कामगार यांना अंधारात ठेवून १०४ हेक्टर ९४ आर जमीन बेकायदेशीर विक्री केली. विक्री केलेल्या क्षेत्रापैकी

कुळ कायदा कलम६३(अ) ५ च्या तरतुदी स अधीन खरेदी विक्रीस, प्रतिबंध व सिलिंग कायद्याने वाटप झालेली ५६हेक्टर ८६आर जमिन देखील बेकायदेशीर विक्री केली. चेअरमन पर्यावरण मंत्री ना. पंकजा मुंडे व इतर संचालक मंडळाची लेखी संमती. सद्या १००० ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे प्रत्येकी १०हजार रु. अनामत ठेवी एकुण १ कोटी रुपये व्याजासह परत द्यावेत. व ७५०० संस्थापक सभासद ऊस उत्पादकांचे भाग भांडवल प्रत्येकी १० हजार रुपये प्रमाणे शेअर्स रक्कम ७ कोटी ५० लाख रु व्याजासह परत द्यावेत. कारखान्यात काम करणारे साखर कामगार यांचे थकीत पगार, सेवानिवृत्त वेतन, इतर लाभांश भत्ते करोडो रुपये तात्काळ विलंब व्याजासह द्यावेत.

▶▶ उर्वरित पान २ वर

**दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांनी स्थापन केलेला वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना त्यांच्या वारसांनी चेअरमन तथा विद्यमान पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे व इतर संचालक मंडळाच्या संगणमताने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना, साखर कामगारांना, इतर वित्तीय कर्ज घेतलेल्या बँकांना अंधारात ठेवून कारखान्याचा व जमिनीचा बेकायदेशीर विक्री व्यवहार केलेला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी साखर आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त चौकशी समिती नेमुन तात्काळ खरेदीखत रद्द करण्याचे आदेश द्यावेत तसेच दोषींवर गुन्हे दाखल करुन ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा यावर्षी ऊस गाळप करण्याचा प्रश्न सोडवावा. अन्यथा येणाऱ्या दिवाळीत ऊस उत्पादक, साखर कामगार यांच्या सह लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या समाधीस्थळावर गोपीनाथगड, पांगरी ता.परळी येथे क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने बेमुदत आंदोलन छेडण्यात येईल.: श्री. कुलदीप करपे जिल्हाध्यक्ष क्रांतिकारी शेतकरी संघटना, बीड जिल्हा**



# रेडिमेड दिवाळी



हल्लीचा काळ झपाट्याने बदलतो आहे. कालपर्यंत संगणक, महासंगणक याला तंत्रज्ञानाच्या युगात श्रेष्ठ स्थान होते आज त्याची जागा कृत्रिम बुद्धिमत्तेने घेतली आहे. आज एआयचा वापर अनेक क्षेत्रांमध्ये होऊ लागला आहे, ज्यामुळे घंटोका काम मिनीटोमे होऊ लागले आहे. काळागणिक मानवाच्या राहणीमानातही बदल होत गेला. वाहतुकीची विविध साधने आल्याने जुनी बैलगाडी, टम टम यांसारखी वाहतुकीची साधने कालबाह्य झाली. बाजारात जाऊन आवश्यक वस्तूंची खरेदीही आता हळूहळू कमी होत चालली आहे. गरजेच्या सर्व वस्तू आता ऑनलाईन ऑर्डर करून घरपोच मागवल्या जाऊ लागल्या आहेत. गेल्या काही वर्षांत माणसाच्या पोषाखांतही कमालीचा बदल झालेला दिसून येतो. प्रत्येकाच्या हातात मोबाईल आल्यामुळे तर मानवाचा समाजाशीही हळूहळू संबंध तुटू लागला आहे. शहरासारख्या ठिकाणी धावपळीच्या जीवनाचा प्रभाव आता सण-उत्सव साजरे करण्यावरही होत चालला आहे.

पूर्वी दसरा सरला की दिवाळीच्या स्वागताची तयारी सुरु होत असे. अख्खे घर झाडून त्याला रंगरंगोटी केली जात असे. घरातील बच्चे कंपनीपासून वयोवृद्धही आपापल्या परीने या मोहीमेत उत्साहाने सहभागी होत असत. साफसफाई झाली कि घराघरांतून दिवाळीच्या फराळाचे सुगंध येऊ लागत. या फराळ बनवण्याच्या प्रक्रियेतही घरातील समस्त मंडळी आपापल्या परीने सहभागी होत असत. घरातील कर्त्या पुरुषाचा बोनस झालेला असायचा, मग टेलरकडे जाऊन नवीन कपडे शिवण्यासाठी माप दिले जाई. कंदिलासाठी काठ्या गोळा करून सुरीने तासून आणि मापात कापून त्यापासून आकाशकंदील बनवला जाई किंवा माळ्यावर ठेवलेला कंदिलाचा जुना सांगाडा काढून त्याला नवीन कागद लावला जाई. घरातील महिला वर्गाची रांगोळ्यांची विशेष तयारी चालू असायची. ठिपक्यांच्या रांगोळीसाठी कागदावर मापात रेषा आखून अगरबत्तीच्या साहाय्याने त्यावर छिद्रे पाडली जात. गेल्या वर्षीचे शिल्लक रंग आणि रांगोळी यांचा अंदाज घेऊन नवीन रंग खरेदी करण्याचा बेत आखला जात असे. ४ दिवसांत दारात कोणत्या ४ रांगोळ्या काढायच्या त्या वहीच्या पानावर पेन्सिलने काढून त्यामध्ये रंग कोणते भरायचे हेही निश्चित केले जात असे. बच्चे कंपनी मातीचे किल्ले बनवण्याची तयारी करत. त्यासाठी आवश्यक साहित्याची जमवाजमव केली जात असे. आपण बनवलेला किल्ला इतरांपेक्षा अधिक उठून कसा दिसेल याची आगळी चढाओढ चालत असे.

नरक चतुर्दशीच्या पहाटे लवकर उठून अभ्यंग स्नान करायचे म्हणून त्याची तयारी आदल्या संध्याकाळपासूनच केली जात असे. घरातील गृहिणी घरीच उटणे बनवत असे. दिवाळीच्या गुलाबी थंडीत पहाटे लवकर उठून अंगाला सुगंधी तेल आणि उटणे लावून आंघोळ करण्यात आणि त्यानंतर अंगठ्याने नरकासुराचे प्रतीक म्हणून अंगठ्याने कारेटे फोडून त्याची कडुशार बी जिभेवर ठेवण्यात वेगळीच मौज असे. दिवाळीच्या पहिल्या आंघोळीची सर वर्षभरात पुन्हा कधीच अनुभवाला येत नसे. सहामाही परीक्षा संपून बच्चे कंपनीला दिवाळीची सुट्टी लागलेली असायची. सुट्टी पडल्यावर सर्वप्रथम मुले शाळेत शिकवल्यानुसार शुभेच्छापत्र बनवायची आणि या शुभेच्छा पत्रांवर दिवाळीच्या शुभेच्छांसह आपुलकीचा संदेश लिहून ती पोस्टाने आपल्या आप्तेष्टांना आणि मित्र मंडळींना पाठवत. घरी बनवलेल्या फराळाच्या विविध पदार्थांची शेजाऱ्या पाजाऱ्यांकडे देवाणघेवाण व्हायची. घरोघरी जाऊन मोठ्यांचे आशीर्वाद घेतले जात असत. आता मात्र चित्र बदलले आहे. शहरासारख्या ठिकाणी घरातील स्त्री पुरुष दोघेही नोकरी व्यवसायानिमित्त प्रतिदिन घराबाहेर पडत असल्याने दिवाळीच्या तयारीवर आणि सण साजरा करण्यावर ऑनलाईनचा आणि रेडिमेडचा प्रभाव दिसू लागला आहे. अनेक घरांत अर्बन किंवा तत्सम कंपन्यांची माणसे बोलावून घराची साफसफाई आणि रंगरंगोटी केली जाते. दारात रांगोळी काढण्यासाठी पुरेसा वेळ नसल्याने किंवा रांगोळी काढण्याची कला अवगत करण्यासाठी कधी प्रयत्नच न केल्यामुळे रांगोळीचे स्टिकर्स लावले जातात किंवा रांगोळीसाठी तयार छापे वापरले जातात. वाढती मागणी लक्षात घेऊन रांगोळ्यांचे विविध आकाराचे छापे आता बाजारातही मोठ्या प्रमाणात मिळू लागले आहेत. कंदीलही रेडिमेड विकत आणून दारावर लावले जाऊ लागले आहेत. मातीच्या पणत्यांची जागा आता विजेच्या तोरणांनी घेतली आहे. दैनंदिन कामाच्या दगदगीत फराळ तरी केव्हा बनवणार त्यामुळे दिवाळीसाठीचा फराळही रेडिमेड विकत आणला जाऊ लागला आहे. लोकांची वाढती मागणी लक्षात घेऊन रेडिमेड फराळाच्या उद्योगालाही गती मिळू लागली आहे. विकत आणलेला फराळ बेताचाच असल्याने आणि तो रेडिमेड असल्याने शेजारीपाजारी देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. ऐन दिवाळीतही टेलर्सची दुकाने ओस पडू लागळी आहेत, रेडिमेड कपड्यांचा प्रभाव वाढल्याने सराईत टेलर्सनी सुद्धा टेलरिंग सोडून रेडिमेड कपड्यांच्या अल्ट्रेशनला सुरुवात केली आहे. भाऊ बहिणींना भाऊबीजेच्या निमित्ताने दिल्या जाणाऱ्या भेटवस्तू सुद्धा त्यांना भाऊबीजेच्या आधीच मिळू लागल्या आहेत, त्यामुळे यंदा दादा ताईकडून काय भेटवस्तू मिळणार याबाबतची उत्सुकताच संपून गेली आहे. हल्ली तर किल्लेही रेडिमेड मिळू लागले आहेत. शुभेच्छापत्र रेडीमेड मिळू लागली आहेत. आता तर शुभेच्छापत्रांचा काळही संपत चालला आहे. प्रत्येकाच्या हातात स्मार्टफोन आले आहेत आणि त्यात व्हॉटस्अपही आहे. आता शुभेच्छांची देवाणघेवाणही व्हॉटस्अपवर होऊ लागली आहे. दिवाळीनिमित्त सुट्टी मिळते म्हणून इतर सुट्यांप्रमाणे दिवाळीलाही लोक उशिरा उठू लागले आहेत. त्यामुळे अभ्यंग स्नान तर बाजूलाच राहिले.

शहरातील लोकांचे राहणीमान उंचावल्याने पूर्वी ज्या प्रकारे दिवाळी श्रीमंतांच्या घरी साजरी होत असे तशी आता चाळीचाळींतूनही ती साजरी होऊ लागली आहे. कामाच्या व्यापामुळे आणि वेळेच्या अभावामुळे आताच्या पिढीला दिवाळीची सारी सिद्धता करण्यास वेळ मिळत नसेलही मात्र रेडिमेडच्या नादात दीपावलीचा खरा आनंद आपण गमावत आहोत हे मात्र नक्की ! शहरातील धकाधकीच्या जीवनातही काही मंडळी आपली संस्कृती जोपासत आहेत, परंपरांचे पालन करत आहेत; मात्र या घरांतील कॉन्व्हेंट मध्ये, इंग्रजी माध्यमांमध्ये शिकणारी भावी पिढी ही परंपरा पुढेही चालवतील का ? की करिअरच्या नादात आपल्या संस्कृतीला विसरतील हाही एक प्रश्न आहे. हिंदू धर्मियांनी आजतागायत काळानुसार आपल्या परंपरांमध्ये, चालीरीतींमध्ये बदल केलेला आहे. मात्र आपण आपल्या संस्कृतीशी जेव्हढी तडजोड करू नेव्हढे खऱ्या आनंदापासून दूर जाऊ हेही तितकेच सत्य आहे.

– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई

◆ पान १ वरून पुढे...

## प्रामाणिक आणि...

आ.संदीप क्षीरसागर यांनी स्पष्ट केले. तसेच बीड नगर पालिकेत नगराध्यक्ष पदाचा आपलाच उमेदवार हा १० हजार मताने निवडून येणार असल्याचा विश्वास व्यक्त केला. तसेच सर्व जागेवर नगरसेवक निवडून येतील. आमदारकीच्या निवडणुकीत सोबत राहिलेल्या आणि माझ्यासाठी एकनिष्ठ प्रामाणिक राहून काम करणाऱ्या जिवाभावाच्या कार्यकर्त्यांसाठी घरातला सदस्य समजून काम करून निवडून आणणार ते असल्याचे सांगून कार्यकर्त्यांना बळ दिले यावेळी आ.संदीप क्षीरसागरांना देखील कार्यकर्त्यांनी देखील आ.संदीप भैय्या जो उमेदवार देतील त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार असल्याचे सांगितले. यावेळी माजी आमदार सय्यद सलीम, पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्यासह पक्षाचे वरिष्ठ नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उपमुख्यमंत्री एकनाथजी...

आरोग्याच्या सुरक्षेसाठी उचललेले आणखी एक पाऊल आहे. पालकमंत्री संजयजी शिरसाट साहेब यांनीही या उपक्रमाचे कौतुक करत सांगितले ही सेवा बीड जिल्ह्याच्या आरोग्य व्यवस्थेला बळकटी देईल. आपत्कालीन प्रसंगी नागरिकांना तत्काळ मदत मिळाल्यामुळे अनेकांचे प्राण वाचतील, हेच आमच्या कार्याचे खरे समाधान आहे. या उपक्रमामुळे बीड जिल्ह्यातील रुग्णवाहिका व्यवस्थेला नवी दिशा मिळाली असून, आपत्कालीन परिस्थितीत आरोग्य सेवेची प्रतिसादक्षमता वाढणार आहे. जनतेची सेवा हेच आमचे ध्येय – शिवसेना सदैव जनतेच्या सेवेसाठी तत्पर.

## 'फुलचंद पान'...

रोहन अशोक मुळूक वय २२ वर्ष राहणार शिवाजीनगर बार्शी रोड बीड तसेच टीम ७५ या पान टपरी चे चालक करण पद्माकर वाकचौरे वय २० वर्ष राहणार अंकुश नगर जुना चाराठा रोड बीड टपरीचे मालक नामे किशोर भानुदास तांदळे वय २६ वर्ष राहणार गल्ली नंबर १६ कालिका नगर बीड यांना ताब्यात घेण्यात आले असून, पुढील तपास सुरू आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर आणि उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पूजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.शितलकुमार बल्लाळ, पोलीस उपनिरीक्षक श्री. संदीप नेवरे, गणेश कुमावत आणि पोलीस अंमलदार पोलीस हवालदार १८०४ बावनकर पोलीस हवालदार १४६९ शेख, पो.शि. ३७५ शिंदे, पोलीस शिपाई १००२ इलियास शेख यांनी केली आहे.

## बीडमध्ये जीवघेण्या....

आलं आहे. औषध प्रशासनाने तातडीने तपास सुरू केला असून सर्व साठा मागवण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे. अहमदाबाद येथील स्मार्टवे वेलनेस प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने तयार केलेल्या या सिरपमुळे जिल्ह्यात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. बीड शहर व तालुक्यात सर्वाधिक पुरवठा... बीड शहर व तालुक्यात रेस्पिफ्रेश कफ सिरपचा मोठ्या प्रमाणात पुरवठा केला जात असल्याचे सांगण्यात आले आहे. यामध्ये बीड जिल्ह्यातील १७७, गेवराई तालुक्यात १६६, परळी तालुक्यात ७२ व आष्टी तालुक्यात १८ बाटल्यांचा पुरवठा झाला आहे. यातील काही बाटल्यांची विक्रीही झाली असल्याचेही सांगण्यात आले आहे. अजूनपर्यंत कोणाची तक्रार नाही– बंदी आसलेल्या रेस्पिफ्रेश कफ सिरपचा साठा विक्री करण्यासाठी काढलेला दोष सापडलेली बॅच व जिल्ह्यात असलेली बॅच ही वेगवेगळी असून अद्याप तरी जिल्ह्यात यामुळे कुणाला त्रास झाल्याची तक्रार दाखल करण्यात आलेली नाही, अशी दिलासादायक माहिती समोर आली आहे

## ससेवाडी - मोरगाव...

ग्रामपातळीवरील प्रशासनाच्या संयुक्त कारवाईतून हा ऐतिहासिक निर्णय प्रत्यक्षात उतरला . ही कारवाई महाराष्ट्र राज्याचे महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या शेतकरी हिताचे निर्णयानुसार विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर आणि बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली . महसूल विभागाच्या शेतकरीहिताच्या धोरणात्मक कार्यपद्धतीचा हा ठोस परिणाम असल्याचे मानले जात आहे . गेल्या पाच – सहा वर्षांपासून हा रस्ता काही व्यक्तींनी अडवून ठेवला होता . त्यामुळे ससेवाडीच्या सुमारे १५० शेतकऱ्यांना शेतीकामासाठी तसेच नागरिकांना दळणवळणासाठी मोठा त्रास सहन करावा लागत होता . अखेर महसूल प्रशासनाने कायदेशीर चौकटीत राहून धाडसी कारवाई केली आणि रस्ता पुन्हा खुला करून ग्रामस्थांना दिलासा दिला . या कार्यवाहीदरम्यान मंडळ अधिकारी सोनाली कदम , ग्राम महसूल अधिकारी रेश्मा तानगे , ससेवाडीचे सरपंच अरुण रसाळ , संदीप कदम , एम . खान तसेच अनेक स्थानिक शेतकरी उपस्थित होते . पोलीस प्रशासनाच्या वतीने सहाय्यक उपनिरीक्षक विठ्ठल राठोड , म . पो . रमा तुरुकमारे , पोलीस नाईक सुदाम शेलार यांनी शिस्तबद्ध सुरक्षेची जबाबदारी पार पाडली . भूमापक ए . बी . चव्हाण , संजय जायभाये आणि ए . एन . बीडकर यांनी रस्त्याच्या सीमारेषा मोजून तांत्रिक अडथळे दूर करत कार्यवाहीची पूर्तता केली . उपस्थित प्रशासनिक पथकाने जेसीबीच्या साहाय्याने रस्त्यावरील अडथळे हटवून मार्ग पुन्हा वाहतुकीसाठी खुला केला . या वेळी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सांगितले की , शेतकऱ्यांचा हक्क आणि सार्वजनिक मार्ग सुरक्षित ठेवणे हे प्रशासनाचे कर्तव्य आहे . शासनाच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांच्या हितासाठी आम्ही तत्पर आहोत . महाराष्ट्र शासनाने अलीकडेच शेतकऱ्यांच्या हितासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय जाहीर केले आहेत . खरीप हंगामासाठी ई – पीक पाहणीस मुदतवाढ देण्यात आली होती . या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना पीकविमा , अनुदान आणि शासकीय योजनांचा लाभ सोयीस्कररीत्या मिळणार आहे . नैसर्गिक आपत्ती नुकसानभरपाई प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी ऑनलाइन पंचनामे प्रणाली राबविण्यात येत आहे . तसेच ड्रोन सर्वेक्षण आणि आधुनिक भूमापन पद्धतीद्वारे नकाशा सुधारणा कार्य देखील सुरू आहे . तहसीलदार शेळके यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले की , प्रत्येक शेतकऱ्याने स्वतःची ई – पीक पाहणी नोंदणी तात्काळ पूर्ण करावी . शासनाच्या विविध लाभयोजनांसाठी ही प्रक्रिया आवश्यक आहे . ग्राम महसूल अधिकारी आणि तलाठी शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मदत करत आहेत . या कारवाईनंतर ससेवाडी , मोरगाव आणि परिसरातील नागरिकांमध्ये समाधान आणि आनंदाचे वातावरण आहे . अनेक शेतकऱ्यांनी महसूल विभागाचे आभार मानत म्हटले की , प्रशासनाने आमचा हक्काचा रस्ता पुन्हा परत मिळवून दिला . आता आमची शेती , वाहतूक आणि दैनंदिन कामे सहज पार पडतील . या घटनाक्रमातून महसूल प्रशासनाने आपल्या जबाबदारीची जाणीव ठेवत एक आदर्श उदाहरण निर्माण केले आहे . शेतकरीहित , कायद्याचा सन्मान आणि विकास या तिन्ही बाबींचा संगम असलेली ही कारवाई बीड जिल्ह्यात सकारात्मक बदलाचे द्योतक ठरत आहे .

## प्रेयसीच्या वाढदिवसाचा....

तो साजरा करण्यासाठी आलेल्या प्रियकराने तिच्यासाठी केकही आणला होता. मात्र केक कापल्यानंतर त्या प्रियसीलाही ठार करण्यात आलं. मेरी तेलगू ही मुलगी डी मार्टमध्ये नोकरी करत होती. तर दिलावर सिंह हा एक हॉटेल व्यावसायिक आहे. सहा वर्षांपूर्वी त्यांची इन्स्टाग्रामवर मैत्री झाली आणि त्याचं रुपांतर प्रेमात झालं. मात्र मेरी तेलगूचे आणखी कुणासोबत तरी प्रेमसंबंध असल्याचा संशय दिलावरला आला. वाढदिवसाच्या निमित्ताने मेरी आणि दिलावर हे वाकड येथील एका लॉजवर भेटले. १० ऑक्टोबर रोजी मेरीचा वाढदिवस असल्याने तिने केक कापून सेलिब्रेशनही केले. त्यानंतर त्याच चाकूने आणि ब्लेडने दिलावरने मेरीवर वार केले आणि तिची हत्या केली. मेरी ही तिसऱ्याच व्यक्तीच्या प्रेमात पडल्याचा त्याला संशय आला आणि त्या संशयाने प्रेमाचा द एन्ड केला. प्रेयसीची हत्या केल्यानंतर दिलावर थेट कोंढवा पोलीस स्टेशनमध्ये हजर झाला. त्यानंतर ही घटना उघडकीस आली. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे.

## गुरूकुलच्या ११...

असतांना त्यांना दिनेश माने व बाळू एकीळवाले या दोघाजणांनी अडवून तुम्ही परिक्षेत पेपर का पाहू दिला नाही असे कारण पुढे करत विद्याथ्यारना मारहाण केली. या मध्ये रोहन, कृष्णा, प्रणव, वैभव, वरद सह ११विद्यार्थी जखमी झाले. घडलेला प्रकार विद्याथ्यारनी अर्जुन महाराज शिंदे यांच्या भावजइरना सांगितला. त्यांनी मग शिंदे यांना दुरध्वनीकरून घटनेची माहिती दिली. शिंदे गुरूकुलात आल्यानंतर त्यांनी जखमी विद्याथ्यारना उपजिल्हा रूग्णालयामध्ये दाखल केले. मुलांना रूग्णालयात घेवून गेल्यानंतर महाराजांचे वडील बाबासाहेब शिंदे यांना देखिल मारहाण करून जखमी करण्यात आले. या प्रकरणी अर्जुन शिंदे यांच्या फिर्यादीवरून दिनेश माने व बाळू एकीळवाले या दोघांविरोधात परळी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## शेतकऱ्यास कोयत्याचा...

हातातील कोयता त्यांच्या गळ्याला लावून त्यांच्याकडील १५००० रुपये रोख बळजबरीने लुटमार करत घेऊन गेला. म्हणून त्या अनोळखी इसमाबाबत बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास हे बीड ग्रामीणचे सपोनि दराडे करत असून बीड ग्रामीण पोलीस आरोपीच्या शोधात आहेत.

## शेकापचा तब्बल दिड ...

दुर दुर रांगा लागल्या होत्या. यावेळी तहसील प्रशासनाने आंदोलकाच्या मागण्याचे निवेदन स्वीकारले. यावेळी पोलिस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता.

## दिवंगत लोकनेते...

मागील १० वर्षात ऊस गाळप केलेल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांना एफआरपी प्रमाणे ऊस बिले दिले नाहीत

थकीत असलेली एफआरपी रक्कम (ऊस दर नियंत्रण कायदा १९६६ च्या तरतुदीनुसार १५% विलंब व्याजासह देण्यात यावी ) यावर्षी वैद्यनाथ कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस गाळप कोठे करायचे हा मोठा प्रश्न ?

१३ बँकांचे करोडो रुपयांचे कर्ज शासनाचे भाग भांडवल कर्ज १६ कोटी ८० लाख १९ हजार रुपये बोजा युनियन बँक ऑफ इंडिया ,उस्मानगर ,औरंगाबाद ,भाग्यलक्ष्मी महिला नागरी को-ऑपरेटिव बँक नांदेड, खामगाव अर्बन बँक ,खामगाव ,बुलडाणा ,जनसेवा सहकारी बँक बोरिवली,नगर अर्बन कॉ. ऑपरेटिव्ह बँक शाखा अहमदनगर ,नागपूर सहकारी बँक लि. नागपूर जनता सहकारी बँक लि. पुणे ,पुणे

कॅन्टोमेंट सहकारी बँक लि.पुणे रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा, अलिबाग ,डोंबिवली नागरी सहकारी बँक शाखा ,औरंगाबाद ,जिजामाता महिला सहकारी बँक लि.पुणे वैद्यनाथ अर्बन को.ऑपरेटिव्ह बँक शाखा पांगरी , ,द्वारकादास मंत्री नागरी सहकारी बँक शाखा परळी , विशेष लेखा परीक्षक वर्ग १ सहकारी संस्था बीड यांचे शासकीय भाग भांडवल रु.६६७.००लाख कर्ज बोजा व शासकीय कर्ज रु.१०१३.१९ लाख कर्ज बोजा फेरफार (१८७६) लीज पेंडंसी फेरफार नंबर( २०२७ ) ४० आर जमीन लोकनेते गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठान ला ९९ वर्षाच्या करारावर १० हजार रु भाडेपट्ट्या ने दिली आहे. राज्य कर आयुक्त वस्तू सेवा कर कार्यालय, बीड यांचा रक्कम रु.२७,६१,०६,३९७/- बोजा आहे फेरफार (२०३८)

राज्य कर आयुक्त वस्तू व सेवा कर कार्यालय,बीड यांचा ३८,९१,७८,६१६/- बोजा आहे फेरफार नंबर (२०७५)

एवढ्या वित्तीय संस्थेचे कर्ज बोजा असताना सरफेसी ऍक्ट नुसार युनियन बँक ऑफ इंडिया सोडता इतर बँकांना जिल्हाधिकारी बीड यांनी नोटीस दिली का ? नाही

सातबारा कर्ज बोजा नोंद असताना दुय्यम निंबधक अंबाजोगाई यांनी खरेदीखत नोंदणीकृत कसे केले ?

कारखाना शेड :-४५०० ढऊ

जुनी डिस्टलरी :३० घडझऊ

नवी डिस्टलरी:३०घडझऊ

इथेनॉल प्लॅन्ट :४५घडझऊ

बग्यास प्लॅन्ट

को जनरेशन : ९चथ+१२चथ

वाहने आणि इतर साहित्य सामुग्री यांचे मूल्य ?

विक्री केलेली कारखान्याची जमीन

गाव पांगरी ता.परळी गट नंबर ३९२ मधील ३ हेक्टर ६३ आर

गट नंबर ६५ मधील २५ आर

गट नंबर ६७ मधील १८ आर

गट नंबर ६८ मधील ६१ आर

गट नंबर ७० मधील १ हेक्टर ३० आर

गट नंबर ७५ मधील १ हेक्टर ३० आर

गट नंबर ७८ मधील १३ आर

गट नंबर ८० मधिल ७९ आर

गट नंबर ८२ मधिल ६४ आर

गट नंबर ८३ मधील ६ आर

गट नंबर ८४ मधिल ५९ आर

गट नंबर ८६ मधिल ६१ आर

गट नंबर८७ मधिल १हेक्टर ४० आर

गट नंबर ८८ मधील २४ आर

गट नंबर८९ मधील ३० आर

गट नंबर ९० मधील ९७ आर

गट नंबर ९२ मधील ५९ आर

गाव कौठळीतांडा ता.परळी येथील

गट नंबर २५१ मधील १३ हेक्टर ११ आर

गट नंबर ३८१ मधील १४ हेक्टर ६५ आर

गट नंबर ३८२ मधील १५ हेक्टर ४४ आर

गट नंबर ३८३ मधील १४ हेक्टर ९४ आर

गट नंबर ३८४ मधिल ८ हेक्टर १५ आर

गट नंबर ३८५ मधील ५ हेक्टर ३८ आर

गट नंबर ३८६ मधिल २ हेक्टर ३१ आर

गट नंबर ३८८मधील ६ हेक्टर ३८ आर

गट नंबर ३८९ मधिल १० हेक्टर ९९ आर

एकुण क्षेत्र १०४ हेक्टर ९४ आर विक्री झाले आहे.

विक्री क्षेत्रापैकी

कौठळी तांडा परळी येथील गट नंबर २५१ मधिल फेरफार क्र .४१३५ नुसार १२ हेक्टर ८० आर क्षेत्र कुळ कायदा कलम ६३ -अ -५ च्या तरतुदीस अधिन खरेदी विक्रीस प्रतिबंध आहे.

गट नंबर ३८१ मधील फेरफार क्र.३०८८ नुसार १४ हेक्टर ६५ आर क्षेत्र खरेदी विक्रीस प्रतिबंध आहे.

गट नंबर ३८२ मधिल फेरफार क्र( १ )नुसार १५ हेक्टर ४४ आर क्षेत्र खरेदी विक्रीस प्रतिबंधित आहे.

गट नंबर ३८५ मधिल ५ हेक्टर २८ आर क्षेत्र फेरफार क्र ३०८८ नुसार खरेदी विक्रीस प्रतिबंध आहे.

गट नंबर ३८६ मधिल २ हेक्टर ३१ आर क्षेत्र फेरफार क्र.३०८८ नुसार खरेदी विक्रीस प्रतिबंध आहे.

गट नंबर ३८८ मधील ६हेक्टर ३८ आर क्षेत्र फेरफार क्र.४२१० नुसार खरेदी विक्रीस प्रतिबंध आहे.

सहदुय्यम निंबधक अंबाजोगाई यांनी ऑफलाइन खरेदी खत नोंदवले विक्री क्षेत्रामधील सातबारावर कर्जाचे बोजे असताना खरेदी विक्री करणे कायदेशीर नाही असे करावयाचा असल्यास ज्या वित्तीय संस्थेचे सातबारावर कर्ज बोजा आहे त्या संस्थेचे ना हरकत अथवा निरंक किंवा बेबाकी असणे आवश्यक असते. खरेदीखत दस्त नंबर ४९ ६६/२०२४ ऑफलाइन नोंदवल्यानंतर मंडळ अधिकारी नागापूर व पिंपळगाव गाडे व तलाठी सज्जा कौठळी (तांडा)व पांगरी ता.परळी यांनी सदर खरेदीखतानुसार नवीन फेरफार नोंदवण्यास आक्षेप आलेला असताना देखील आक्षेपाचा विचार न करता खरेदी खताआधारे नवीन खरेदीदाराची नोंद घेतली आहे. यावर उपजिल्हाधिकारी परळी यांच्याकडे ऍड. परमेश्वर गित्ते ,परळी यांनी लेखी तक्रार दिली असुन.१५ दिवसात अहवाल सादर करण्याचे मंडळ अधिकारी ,गाडे पिंपळ गाव ,नागापूर ,तलाठीसज्जा कोठळी तांडा ,पांगरी यांना आदेश दिले आहेत.

◆ पान ४ वरून पुढे...

## मांजरसुंबा महामार्ग....

कारवाई केली. महामार्ग पोलिसांना एमएच २३ एयू ४७८३ या क्रमांकाच्या पिकअपचा संशय आला. त्यामुळे त्यांनी त्याचा पाठलाग करून वाहन थांबवण्यात आले. गाडी थांबताच पिकअपमधील तीन पुरुष पळून गेले. पोलिसांनी तपासणी केली असता, पिकअपमध्ये गुलाबी रंगाच्या २२ बॅगा (हिरा का बाबोजी पान मसाला) आणि निळ्या रंगाच्या ११ बॅगा (रोयॉल २२० तंबाखू) मध्ये एकूण ६ लाख ६७ हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा आढळला. सोबतच सहा लाख रूपयांचे पीकअप असा १२ लाख ६७ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई सहायक पोलिस निरीक्षक बालाजी ढगारेव त्यांच्या पथकाने केली.

## पुरग्रस्तांच्या नावाखाली...

असतानाही उपस्थितांनीच साहित्यांच्या किटवर डल्ला मारला तोही उपस्थित प्रशासकिय अधिकार्यांसमोर. दरम्यान शहरातील जुन्या बाजारतळातील १७ कुटूंबीयांसह तालुक्यातील शेकडो पूरग्रस्तांचा यादीत समावेश असताना सेवा-भावी च्या आयोजकांनी जानिवपूर्वक मर्जीतल्या लोकांनाच कार्यक्रमाचे आमंत्रण दिले. ज्यामुळे गरिब गरजू पूरग्रस्तांच्या नावाखाली कार्यक्रमास उपस्थित राहिलेल्या हितचिंतकांना मलिद्यावर सहज डल्ला मारता यावा हा ढोबळ उद्देश लपूण राहिला नाही. शिरूर शहरात पूरग्रस्तांच्या मदतीसाठी राज्यभरातून समाजिकसंस्थांनी पुढाकार घेतला आहे. मात्र, पूरग्रस्तांच्या नावाखाली इतरांचे चांगभले होत असताना डोळस व जाणकारांनीही डोळे झाकून कानावर हात ठेवले आहेत. गरीब, गरजू पूरग्रस्तांच्या नावाखाली घराच्या उतरंडी भरणार्या लाभार्थी टोळक्यांना आवर कोण घालणार असा प्रश्न आहे. आज तर कहरच झाला प्रत्यक्षात या गैरकारभारावर नियंत्रण ठेवणार्या प्रशासिकय अधिकार्यांसमोरच लूटीचा प्रकार घडल्याने गरीब गरजू, खर्या पूरग्रस्तांना न्याय मिळणं धूसरच म्हणावा लागेल.

## जिल्ह्यानंतर विभागातही...

आळंदी यांसारख्या विविध ठिकाणी झालेल्या आंतरराष्ट्रीय फिडे चेस स्पर्धांमध्ये अनेक पदके आणि रोख बक्षिसे जिंकून आपल्या बुद्धीचातुर्याची चुणूक दाखवली आहे. सोहमला बुद्धिबळ प्रशिक्षक श्री.दत्तात्रेय क्षीरसागर व रामप्रसाद शेंडगे सरांचे व बीड डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनचे सचिव श्री.अशोक कागदे सरांचे बहुमोल मार्गदर्शन लाभत आहे.सोहमला त्याच्या आई वडिलांची देखील भक्कम साथ आहे.यापूर्वी इयत्ता पहिलीत असताना युवातर्फे घेण्यात आलेल्या 'मास्टर स्ट्रोक' चित्रकला स्पर्धेतही सोहमने मुंबईपर्यंत मजल मारत 'स्टेट विनर' चा बहुमान मिळवला होता.सध्या सोहमचे पूर्ण लक्ष्य आगामी राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेवर केंद्रित झाले असून, तो कठोर सराव करत आहे.बीडच्या या युवा खेळाडूचे सर्वत्र अभिनंदन होत असून, तो राज्याच्या स्पर्धेतही चमकदार कामगिरी करेल,अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## ऊस तोडणी व वाहतुकीच...

प्रमाणे प्रकरण मा. न्यायालयात दाखल केले होते या प्रकरणी ॲड. निळकंठ अर्जुनराव बारगजे यांनी सादर केलेले पुरावे व युक्तीबाद ग्राह्य धरूण नवनाथ भगवान घाडगे रा. केतुरा ता.बीड यास बीड येथील दुसरे अति - मुख्य न्यायदंडाधिकारी श्री. के.के. पाटील यांनी रक्कम ५००,००० रुपये दंड व २ महीन्याची कारावासाची शिक्षा सुनावली आहे. फिर्यादी तर्फे ॲड. निळकंठ ए. बारगजे, बीड यांनी काम पाहीले त्यांना ॲड. जि.एम. केकान यांनी मार्गदर्शन केले व ॲड. एस.बी.खाडे व ॲड. रोटे डि.एम., ॲड डी. व्ही. शिंदे यांनी सहकार्य केले.

## मोबाईलमुळे ८० टक्के...

त्यानेच हा भवसागर तरायचा आहे, ही श्रद्धा पक्की झाली पाहिजे. देवाच्या गुणांचे स्मरण (चतुर तू शिरोमणी! गुणलावण्याची खाणी!): दुस-या चरणात, भे आपल्या आराध्यदेवाच्या गुणांचे, लावण्याचे आणि सर्वोत्कृष्टतेचे (शिरोमणी) स्मरण करतो. विठ्ठल रूप हे सर्व दिव्य गुणांची खाण आहे आणि तोच खरा दातारा आहे, अशी भावना मनात रुजवली जाते.आध्यात्मिक प्रकाशाची गरज (करी त्रिमिराचा नाश! उद्यो होऊनी प्रकाश!):

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# आशा स्वयंसेविका - गटप्रवर्तक कर्मचारी कृती समितीची आरोग्यमंत्री व आयुक्तांसोबत सविस्तर चर्चा; अनेक मागण्यांबाबत शासन सकारात्मक

## नवीन मोबाईल फोन देणार, रिचार्ज भत्ता 100 वरून 300 रु.; भाऊबीज भेटीवर मंत्रिमंडळ पातळीवर विचार होणार; गटप्रवर्तकांना कंत्राटी कर्मचाऱ्याचा दर्जा देण्यासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठवून पाठपुरावा करणार

**मुंबई । प्रतिनिधी**

आझाद मैदानावर दि.१० ऑक्टोबर २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य आशा स्वयंसेविका – गटप्रवर्तक कर्मचारी कृती समितीच्या शिष्टमंडळाची राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर, आरोग्य सेवा आयुक्त तथा संचालक मा.कादंबरी बलकवडे, सहसंचालक (अ. तांत्रिक) मा.राजेंद्र भालेराव, राज्य समन्वयक स्वाती पाटील यांच्यासोबत सविस्तर चर्चा झाली. या चर्चेत अनेक प्रलंबित मागण्यांबाबत शासन सकारात्मक असल्याचे कृती समितीने सांगितले. आरोग्यमंत्री मा.प्रकाश अबिटकर यांनी आशा स्वयंसेविकांना व गटप्रवर्तकाना भाऊबीज भेट या विषयावर मंत्रिमंडळ पातळीवर चर्चा करून निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. तसेच गटप्रवर्तकांना कंत्राटी कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्यासाठीचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठवून पाठपुरावा केला जाईल, असे सांगितले. आरोग्य आयुक्त तथा संचालक मा. कादंबरी बालकवडे यांच्या दालनातील बैठकीत आशाना मोबाईल रिचार्ज भत्ता १०० रुपयांवरून वाढवून ३०० रुपये देण्याचा निर्णय घेण्यात आला असून, नवीन मोबाईल देण्यासाठीचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच सेवानिवृत्तीचे वय ६० वरून ६५ वर्षे करण्याबाबत मागील आदेश पुनर्विचारात घेतला जाईल, असे आयुक्तांनी स्पष्ट केले. गटप्रवर्तकांना एक समान रंगाचा गणवेश देण्याबाबत चर्चा झाली.

आशा स्वयंसेविकांना ऑनलाइन काम ाबाबत सक्ती नाही असे स्पष्ट करण्यात आले असून, इतर विभागाकडून आशांना काही ऑनलाईन कामे लावत असतील तर त्याबाबत त्या विभागाशी आयुक्त स्तरावरून पत्रव्यवहार करण्याचे आश्वासन दिले. थकीत मानधन




त्वरित देण्यासाठी आणि ' लाडकी बहिण ' योजनेंतर्गत रजिस्ट्रेशन केल्याचा मोबदला मिळवून देण्यासाठी पाठपुरावा केला जाईल, असेही त्यांनी सांगितले. तसेच बायोमेट्रिकची सक्ती गट प्रवर्तकांना केली जाणार नाही आणि प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर आशांना दररोज हजेरी लावण्याची जबाबदारी राहणार नाही, असा दिलासा कृती समितीला मिळाला. आरोग्यमंत्री, प्रधान सचिव आणि आयुक्त यांच्या स्तरावर लवकरच कृती समितीसोबत सर्वसमावेशक बैठक घेऊन सर्व प्रश्न मार्गी लावले जातील, असेही आश्वासन देण्यात आले. तसेच राज्य सरकारकडून ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्याचे मानधन पुढील तीन दिवसांत जमा होणार,असेही सांगण्यात आले. आशा व गटप्रवर्तकांना सन्मानाची वागणूक आरोग्य विभागात मिळावी यासाठी आदेश काढण्यात येणार आहे. यानंतर कृती समितीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, आरोग्यमंत्री प्रकाश अबिटकर तसेच संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन दिले.

या निवेदनातील प्रमुख मागण्या – पाच महिन्यांचे (मे ते सप्टेंबर २०२५) केंद्रहिश्याचे थकीत मानधन तात्काळ देण्यात यावे. दरमहा पाच तारखेपर्यंत केंद्र व राज्य निधीतून नियमितपणे एकत्रित मानधन मिळावे. ५ मोबाईल फोन, सिम कार्ड व अमर्यादित डेटा पॅक मिळेपर्यंत ऑनलाइन कामावर बहिष्कार कायम ठेवावा. दिवाळीपूर्वी पाच हजार रुपयांची भाऊबीज भेट मिळावी. गटप्रवर्तकांना कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या श्रेणीत समाविष्ट करून ३५ हजार रुपये किमान वेतन लागू करावे. आशा कार्यकर्त्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६५ वर्षे करावे किंवा दरमहा ५,००० रुपये निर्वाह भत्ता द्यावा. बायोमेट्रिक हजेरी रद्द करावी. आरोग्य केंद्रांवर आशांसाठी मुक्काम कक्षाची व्यवस्था करावी. प्रसूती व आजारपणाची भरपगारी रजा लागू करावी. कार्यरत असताना मृत्यू झाल्यास वारसांना १० लाख रुपये नुकसान भरपाई द्यावी. या मागण्यांच्या मंजुरीसाठी दि. १० ऑक्टोबर २०२५ रोजी आझाद मैदान, मुंबई येथे सकाळी ११ वाजता भव्य मोर्चा व तीव्र निदर्शने करण्यात आले. शिष्टमंडळात कॉ. राजू देसले, भगवान देशमुख, नीलेश दातखिळे, दत्ता देशमुख, वैशाली खंदारे, पुष्पा पाटील, आरम ायटी इराणी, ज्योती उराडे, चंद्रा कांबळे, मधुकर कदम आदी उपस्थित होते. राज्यभरासह बीड जिल्ह्यातून मोठ्या संख्येने आशा व गटप्रवर्तक आंदोलनात सहभागी झाल्या होत्या.

# आ. सुरेश धस यांच्या प्रयत्नाने मुख्यमंत्री सहायता निधी व विविध शासकीय योजनांद्वारे अनेक रुग्णांना नवसंजीवनी

## गेल्या वीस वर्षांपासून अविरत रुग्णसेवा देणारं 'अवलिया' रूग्णसेवक विकास साळवे

**आष्टी । प्रतिनिधी**

दु:खात असलेल्या माणसाला आधार देणं, हेच खरं देवपूजेचं काम आहे, – या भावनेला मूर्त रूप देत आष्टी तालुक्यात गेल्या दोन दशकांपासून 'रुग्णसेवा' हेच आपले ध्येय मानून काम करणारे समाजसेवक विकास साळवे यांनी हजारो रुग्णांना जीवनदान दिलं आहे. मराठवाडा भूषण, लोकनेते आ. सुरेश धस यांच्या प्रेरणेतून आणि माध्यमातून त्यांनी सामाजिक कार्याला नवा आयाम दिला आहे. गोर–गरीब, शेतकरी, मजूर, कामगार, आजारपणाच्या चक्रात सापडलेल्या कुठल्याही रुग्णाला



मदत मिळावी म्हणून विकास साळवे हे नेहमी रात्री कितीही वाजता आ.सुरेश धस यांचा फोन आला की तात्पुरतेने पोहोचतात. आणि त्या रुग्णांची मदत करतात. मुख्यमंत्री सहायता निधी, पीएम निधी प्रधानमंत्री जनआरोग्य योजना (आयुष्यमान भारत), माझी कुटुंब माझी जबाबदारी, तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ गरजूंपर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांनी अत्यंत तत्परतेने काम केलं आहे.

आ.सुरेश धस यांच्या अथक प्रयत्नांतून आतापर्यंत अनेक रुग्णांचे महागडे ऑपरेशन, हृदयविकार, किडनी, कर्करोग व व्हेंटिलेटर आवश्यकता असेलच तर आम्ही सोय करतात धर्मदाय रुग्णालयात बेड सवलती फायदा करून देतो गंभीर आजारांनी ग्रस्त असलेल्या लोकांना आर्थिक मदत मिळाली आहे. काही जणांना वेळेवर रक्त, औषधे, आणि रुग्णवाहिका सेवा उपलब्ध करून देत त्यांच्या कुटुंबाचे आयुष्य बदलले आहे. आ. सुरेश धस यांच्या माणुसकीच्या स्पर्शाने आणि त्यांच्याच मार्गदर्शनाखाली ही रुग्णसेवा मोहीम केवळ एक उपक्रम न राहता माणुसकीचा श्वास बनली आहे.आ. धस यांच्या जनतेसाठी, जनतेच्या मनातून या कार्यपद्धतीचा परिणाम म्हणून आज हजारो कुटुंबे आ.धस यांच्या नावाने कृतज्ञतेने स्मरण करतात. रुग्णसेवक विकास साळवे व दता हुले, सोमनाथ कोल्हे, अमर वाळके,सुशील ढोले,प्रतिक काळे या टीमच्या माध्यमातून दर आठवड्याला शेकडो रुग्ण बरे होतात, रुग्णांना शासकीय मदतीसाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली जाते, हॉस्पिटलपर्यंत पोहोचण्यासाठी सहकार्य दिलं जातं. विकास साळवे यांचे हे कार्य आज अनेक सामाजिक संघटनांसाठी आदर्शवत उदाहरण ठरत आहे. रुग्णसेवा हीच खरी देशसेवा हे वाक्य विकास साळवे यांनी केवळ उच्चारलेलं नाही, तर ते जगून दाखवलं आहे. त्यांच्या या सेवाभावी वृत्तीला आ. सुरेश धस यांचे प्रोत्साहन आणि आधार लाभत असून आज म राठवाड्यातील जनतेच्या आशेचा दीपस्तंभ बनली आहे.

# कृषीभूषण शिवराम घोडके यांचे स्वप्न साकार

**देशातील पहिले नैसर्गिक शेती पी.जि.एस. प्रमाणीकरण प्रमाणपत्र बीड जिल्ह्यातील श्री अशोक पठाडे व श्रीमती वनमाला बोरकर यांना मा. पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी हस्ते प्रदान**

**गेवराई । प्रतिनिधी**

नवी दिल्ली येथील राष्ट्रीय कृषीशास्त्र कॉम्प्लेक्स , पुसा कॅम्पस येथे मा. पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते प्रधानमंत्री धन धान्य कृषी योजना व दलहन आत्म निर्भरता मिशन या योजनेची सुरवात करण्यात आली, नैसर्गिक शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचाही सन्मान मा. पंतप्रधान साहेबांच्या हस्ते प्रमाणपत्र देवून करण्यात आला , पंतप्रधान यांनी २०२४ पासून राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन अभियान या उपक्रम राबवण्यास सुरवात केली आहे, या देशभरातील शेतकऱ्यांना रासायनिक शेती चे दुष्परिणाम अवगत करून शेतकऱ्यांना नैसर्गिक व शास्वत शेतीत रुपांतर करण्यास प्रोत्साहन देणे हे या योजनेचे



मुख्य उद्दिष्ठ आहे, व त्यानुसार शेतकऱ्यांना आपला उत्पादित केलेला माल विक्री करण्यासाठी पी. जी. एस. नैसर्गिक प्रमाणपत्राची गरज भासते, अश्या शेतकऱ्यांचे प्रमाणीकरण करण्यासाठी देशभरात प्रादेशिक परिषदा कार्यरत आहेत त्यानुषंगाने बीड जिल्ह्यातील बळीराजा कृषी विज्ञान मंडळ , लोळदगाव या प्रादेशिक परिषदेच्या मार्फत व कृषीभूषण शिवरामजी घोडके यांच्या सखोल मार्गदर्शनाखाली बोरीपिंपळगाव ता.गेवराई येथील नैसर्गिक शेती करणारे शेतकरी श्री अशोक पठाडे व तळणेवाडी ता. गेवराई येथील श्रीमती वनमाला तुकाराम बोरकर यांना देशातील पहिले नैसर्गिक शेती पी.जी.एस. प्रमाणीकरण प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले ,

# 'महाराष्ट्र राज्य निर्यात पुरस्कार' : निर्यात क्षेत्रातील उद्योजकांचा होणार सन्मान

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील उद्योजकांनी त्यांच्या अप्रतिम कार्यक्षमतेच्या आणि नवोन्मेषी दृष्टिकोनाच्या बळावर जागतिक बाजारपेठेत भक्कम स्थान निर्माण केले आहे. त्यांच्या या योगदानाचा गौरव करण्यासाठी राज्य शासनामार्फत 'महाराष्ट्र राज्य निर्यात पुरस्कार' देऊन त्यांना सन्मानित करण्यात येणार आहे. हे पुरस्कार वितरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योगमंत्री उदय सामंत, उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या हस्ते सोमवार, १३ ऑक्टोबर २०२५ रोजी हॉटेल ताज लँड्स एंड, मुंबई येथे प्रदान करण्यात येणार आहेत.

सन २०२२–२३ आणि २०२३–२४ या वर्षांतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल एकूण ६७ उद्योजकांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये ४६ सुवर्ण पुरस्कार, १७ रौप्य पुरस्कार आणि चार प्रशस्तीपत्रे प्रदान करण्यात येणार आहेत. पुरस्कारांची निवड आठ श्रेणींमध्ये करण्यात आली असून त्यात निर्यातदार– मोठे उत्पादक घटक, सूक्ष्म, लघु व मध्यम उत्पादक, व्यापारी निर्यातदार, मान्यताप्राप्त निर्यात गृह, व्यापार गृह, लघु उत्पादक निर्यातदारांसाठी प्रादेशिक पुरस्कार, राज्य शासनातील महामंडळे आणि सेवा निर्यातदार यांचा समावेश आहे.म हाराष्ट्र निर्यातीमध्ये अग्रगण्य महाराष्ट्राने देशाच्या निर्यातीमध्ये आपले अग्रगण्य स्थान कायम राखले असून, २०२४–२५ या आर्थिक वर्षात राज्याची निर्यात ₹५.५७ लाख कोटी आहे. ही भारताच्या एकूण निर्यातीच्या सुमारे १५.०५ टक्के आहे. राज्यातील पुणे, मुंबई उपनगर, मुंबई शहर, ठाणे आणि रायगड हे पाच जिल्हे निर्यातीत आघाडीवर आहेत. या जिल्ह्यांचा राज्याच्या एकूण निर्यातीमध्ये ७३ टक्के वाटा आहे.

महाराष्ट्रातून प्रामुख्याने अमेरिका, यु.ए.ई, हाँगकाँग, बेल्जियम, युनायटेड किंगडम, चीन, सौदी अरेबिया, नेदरलँड्स, जर्मनी आणि मेक्सिको या देशांमध्ये रत्ने व आभूषणे, अभियांत्रिकी वस्तू, इलेक्ट्रॉनिक्स व विद्युत घटक, रसायने आणि वस्त्रोद्योग या क्षेत्रांतील वस्तूंची निर्यात केली जाते.

'महाराष्ट्र निर्यात प्रोत्साहन धोरण २०२३' निर्यात वाढीसाठी राज्य शासनाने 'महाराष्ट्र निर्यात प्रोत्साहन धोरण २०२३' अंतर्गत अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. या धोरणांतर्गत आर्थिक प्रोत्साहने,

# २००००००००० रुपयांचे सोने, करोडींचा रोकड आणि एक योगायोग... एका साध्या अपघाताने महाराष्ट्रातील खजिन्याचे रहस्य उलगडले

**सोलापूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात घडलेल्या एका साध्या अपघतामुळे मोठ्या दरोड्याचे रहस्य उलगडले आहे. कर्नाटकात हा दरोडा पडला होता. २००००००००० रुपयांचे सोने, करोडींचा रोकड आणि एक योगायोग. हा दरोडे खोर ज्या पद्धतीनो पोलिसांच्या हाती लाले तो घटनाक्रमक पाहिला असता कहानी एकदम फिल्मी वाटत आहे. जाणून घेऊया नेमकं काय घडले.

६ सप्टेंबर २०२५ रोजी संध्याकाळी ६:३० वाजता, कर्नाटकातील विजयपुरा जिल्ह्यातील चडचन शहरातील एसबीआय शाखेत तीन मुखवटा घातलेले लोक घुसले. त्यांनी कर्मचाऱ्यांना ओलीस ठेवले आणि अंदाजे १ कोटी रुपये रोख आणि सुमारे २० किलो सोने घेऊन पळून गेले. पोलिसांनी चोरांचा




शोध घेतला पण त्यांना ते सापडले नाहीत. त्यांनी सर्व आशा सोडल्या होत्या, पण नंतर असे काही घडले जे ज्याची कुणाला कल्पनाही नसेल,

चोरीला गेलेल्या सोन्याची किंमत बाजारात २० कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. म्हणजेच एकूण २१ कोटी रुपयांच्या प्रकरणाचा समावेश आहे. २१ सप्टेंबर रोजी या प्रकरणात एक धक्कादायक ट्विस्ट आला. म हाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यातील हुलजंती गावात एका माणसाच्या व्हॅनचा किरकोळ अपघात झाला. स्थानिक लोकांची गर्दी लगेच जम ली. तथापि, चालकाने अचानक पिस्तूल काढले आणि लोकांना धमकावत घटनास्थळावरून पळ काढला.

अपघातानंतर ड्रायवर वाहन आहे तिथे सोडून पळून गेला. अपघाताची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले. यावेळी पोलिसांना २१ पाकिटे सोने सापडले, एकूण अंदाजे ८३३ ग्रॅम होते. याव्यतिरिक्त, कारमध्ये १ लाख रुपयांहून अधिक रोख रक्कम देखील सापडली. याचा अर्थ पोलिसांना जास्त कष्ट करावे लागले नाहीत; सोने स्वतःहून त्यांच्याकडे आले.

१.५ किलो सोने आणि ४४.२५ लाख रुपये पोलिसांनी जप्त केले आहेत. पोलिसांनी सोने आणि पैसे जप्त केले असले तरी, चोर अजूनही फरार होते. पोलिसांनी कारच्या मालकांना पकडण्याच्या आशेने संपूर्ण परिसरात शोध सुरू केला. दोन दिवसांच्या शोधानंतर, आणखी एक मोठा शोध लागला. एका बंद घराच्या छतावर एक बॅग सापडली. या बॅगेत ६.५४ किलो सोने आणि अंदाजे ४१ लाख रुपये रोख होते. त्याच गावातील एका व्यक्तीलाही पोलिसांनी अटक केली जो कारमधील सोने आणि रोख रक्कम घेऊन पळून गेला होता. त्याच्याकडून १.५ किलो सोने आणि ४४.२५ लाख रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आली.

आता पोलिसांनी संशयितांची नावे दिली आहेत: राकेश कुमार साहनी, राजकुमार पासवान आणि रक्षक कुमार. हे सर्वजण सुमारे २१–२२ वर्षांचे आहेत. महाराष्ट्रातील रहिवासी असलेला चौथा आरोपी संपूर्ण दरोड्याचा सूत्रधार आहे. तो रेकी करण्यासाठी वारंवार बँकेत गेला होता आणि त्याने सोलापूर जिल्ह्यातून एक कारही चोरली होती, जी दरोड्यात वापरली गेली होती. उर्वरित तीन संशयितांना पोलिसांनी बिहारम धील समस्तीपूर येथून अटक केली होती, तर चौथ्याला ७ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्रात अटक करण्यात आली होती.

# सुमित राऊत राज्यस्तरीय तायक्कांदो स्पर्धेस पात्र



**बीड । प्रतिनिधी**

दि. ५ ऑक्टोंबर २००५ रोजी संपन्न झाालेल्या क्रीडा व युवक सेवा संचलनालय पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यम ाने आयोजित विभागीय तायक्कॉंदो क्रीडा स्पर्धेत सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाचा खेळाडू सुमित सिध्देश्वर राउत याने १९ वर्षाखालील वयोगटात ५९ ते ६३ किलो वजनी गटात प्रथम येण्याचा बहुमान पटकावला व पुढील होणा–या राज्यस्तरीय शालेय तायक्कॉंदो क्रीडा स्पर्धेस त्याने आपले नाव निश्चित केले.

या यशाबद्दल नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. योगेश क्षीरसागर, संस्थेच्या उपाध्यक्ष डॉ. दीपा क्षीरसागर, माजी नगराध्यक्ष डॉ. भारतभुषण क्षीरसागर, संचालक डॉ. सारीका क्षीरसागर, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे, डॉ. विश्वांभर देशमाने, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर, उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे, कम वि चे उपप्राचार्य नारायण काकडे, पर्यवेक्षक श्री जालिंदर कोळेकर, क्रीडा विभागप्रमुख डॉ. भागचंद सानप, अमृतसिंग बिसेन,

# आयुर्वेदातील संशोधनासाठी शासनाचे अनुदान, विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा : डॉ. जाई किरण किनी

## आदित्य आयुर्वेद महाविद्यालयात विद्यार्थ्यांना दिले संशोधनविषयक मार्गदर्शन

**बीड । प्रतिनिधी**

आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या संकल्पनेतून व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या उद्देशाने आदित्य आयुर्वेद महाविद्यालयात आरोग्यशास्त्रातील आजच्या आधुनिक कालानुरूप संशोधन या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेसाठी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या रिसर्च कौन्सिल मेंबर व केंद्र शासन आयुष रिसर्च ऍडव्हायझरी कमिटी मेंबर असलेल्या मुंबईच्या डॉ. जाई किरण किनी यांना प्रमुख वक्ता म्हणून आमंत्रित करण्यात आले



होते. त्यांनी Conducting Clinical Trials and Writing Research Paper - Practical Guide या विषयावर विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना मार्गदर्शन केले. सकाळी १०:३० वाजता धन्वंतरी पूजन व स्तवनाने कार्यक्रमाचे उद्धाटन झाले. त्यानंतर चार सत्रात ही कार्यशाळा पार पडली. सुरुवातीच्या सत्रात संशोधनाची व्याख्या, गरज आणि प्रकार यांवर त्यांनी सखोल विवेचन केले. पुढील सत्रांमध्ये विद्यार्थी आणि प्राध्यापकांसाठी वेगवेगळी प्रायोगिक मार्गदर्शक सत्रे घेण्यात आली. भोजनोत्तर सत्रात त्यांनी राज्य व केंद्र शासनाच्या विविध संशोधन योजनांची माहिती दिली. अंतिम सत्रात विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्ष रिसर्च पेपर लिहून घेत मार्गदर्शन करण्यात आले. या कार्य शाळेत आदित्य आयुर्वेद महाविद्यालये सर्व वर्षाचे २०० विद्यार्थी, ४० प्राध्यापक तसेच विशेष म्हणजे आदित्य दंत महाविद्यालयातील पदव्युत्तर (चऊ‌ड) च्या विद्यार्थ्यांनीही सहभाग घेतला. कार्यशाळेचे सूत्रसंचालन महाविद्यालयातील बालरोग विभागाचे प्राध्यापक डॉ. शाम जोशी यांनी केले तर प्रास्ताविक डॉ. स्नेहा साबळे यांनी केले. प्रदीप राठोड, विष्णू झरकर, ऋतुजा देशम ुख, द्वितीय वर्षाचे सुशील कांबळे, सानिया बनेवाले, ऋतुजा नवले, प्रथम वर्षाचे गायत्री दुधाळ, क्रांति भुंबे, सायली वाघ, रेहान मुल्लानी, साद चाऊस या ११ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे स्टेजवर समोर येवून कार्यशाळे विषयी आपला अभिप्राय दिला. प्रा. रामेश्वर ढोबळे यांनी आभार मानले.

**आयुर्वेदाची आपल्याला नितांत गरज आहे. आयुर्वेदामध्ये आधुनिक संशोधन होणे गरजेचे आहे. पदवीच्या विद्यार्थांचा संशोधनात सहभाग अत्यंत महत्वाचा आहे. आयुर्वेदावर प्रोजेक्ट लिखान, संशोधनासाठी मोठ्या प्रमाणात अनुदान असते. विद्यार्थ्यांनी या शासनाच्या योजनेचा लाभ घेऊन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी आयुर्वेदात आधुनिक संशोधन करावे. या संदर्भात विद्यार्थांना मार्गदर्शन करण्यासाठी मला आदित्य आयुर्वेद महाविद्यालयात बोलावण्यात आले होते. आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थी खूप उत्साही आहेत. काहीतरी नविन शिकण्याचा विद्यार्थ्यांमध्ये उत्साह आहे.**
**–डॉ. जाई किरण किनी**

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
# मराठवाडा पत्र
• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • रविवार, दि. १२ ऑक्टोबर २०२५ • पान ४

# सिमा ओस्तवाल शेतकऱ्यांसाठी देवदूत

• पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी मानवतेचा हात! जैन स्वयंसेवक मंडळ व गुरु आनंद महिला प्रतिष्ठानचा हृदयस्पर्शी उपक्रम
• शहाजनपूर, शिरसमार्ग, तरटेवाडी, दिमाखवाडी, काळवाडी पंचक्रोशीतील शेतकऱ्यांना किराणा वाटप


**बीड । प्रतिनिधी**

पूरग्रस्तांच्या अश्रूंना दिलासा देणारा आणि मानवतेचा अद्भुत संदेश देणारा एक हृदयस्पर्शी उपक्रम बीड जिल्ह्यात राबविण्यात आला. श्री मुंबई जैन स्वयंसेवक मंडळ, गुलालवाडी (मुंबई) यांच्या सहकार्याने गुरु आनंद महिला प्रतिष्ठान, बीड यांच्या वतीने पूरग्रस्त शेतकरी बांधवांना जीवनावश्यक किराणा साहित्याचे वाटप करण्यात आले.शहाजनपूर, शिरसमार्ग, तरटेवाडी, दिमाखवाडी आणि काळवाडी या पंचक्रोशीतील शेतकरी कुटुंबांना या मदतीचा लाभ मिळाला.

पूरामुळे संकटात सापडलेल्या अनेक कुटुंबांना या उपक्रमामुळे मोठा दिलासा मिळाल्याचे चित्र पाहायला मिळाले. वाटप करण्यात आलेल्या किराणा किट्समध्ये गहू, तांदूळ, साखर, गूळ, दाळ, रवा, तेल, चहा पत्ती आदी जीवनावश्यक वस्तूंचा समावेश होता.या सामाजिक उपक्रमात समीरभाई शहा, श्री. विशालजी शहा आणि श्री. दीपकभाई डोशी यांनी पुढाकार घेत पूरग्रस्त शेतकरी बांधवांना मदतीचा हात दिला. स्थानिक नागरिकांनी या उपक्रमाचे मनापासून स्वागत करत म्हटले की, मानवतेचे संवेदनशील दर्शन घडवणारा हा उपक्रम पूरग्रस्तांसाठी आशेचा किरण ठरला आहे. म ानवतेचा संगम, संवेदनांचा स्पर्श आणि समाजबंधाची जाणीव – हाच गुरु आनंद महिला प्रतिष्ठान व जैन स्वयंसेवक मंडळ यांच्या कार्याचा खरा चेहरा ठरला आहे!



## पोलिस अधीक्षक साहेब शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडलंच आहे; निदान बालकांच्या मनातील दहशत तरी संपवा: डॉ. गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

बीडचे पोलिस अधीक्षक नवनित कांवत यांनी पवनचक्की कंपन्यांची बाजू घेऊन शेतकऱ्यांची आर्थिक आणि मानसिक पिळवणूक सुरू ठेवण्यासाठी शेतकऱ्यांना अक्षरशः वाऱ्यावर सोडलं आहे, असा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे. डॉ. ढवळे म्हणाले, खाकी वर्दीचे ब्रीदवाक्य 'सदरक्षणाय खलनिग्रहणाय' आहे. या ब्रीदवाक्याचा सन्मान राखण्यासाठी तरी पोलिस प्रशासनाने निष्पाप बालकांवर हल्ला करणाऱ्या गुंडांची शहरभर धिंड काढावी. अलीकडेच परळी तालुक्यातील नर्मदेश्वर गुरूकुलात अध्यात्माचे शिक्षण घेणाऱ्या ११ विद्यार्थ्यांवर बेल्ट आणि बांबूने निर्दय मारहाण करण्यात आली. या मुलांच्या अंगावर जखमेच्या खुणा उमटल्या आहेत. हल्लेखोरांनी गुरूकुलातील अध्यात्मिक साहित्य, मृदंगासह शैक्षणिक ग्रंथांची तोडफोड केली असून मोठे नुकसान केले आहे. अध्यात्म आणि संस्काराचे धडे घेणाऱ्या बाल वारकऱ्यांवरील हा हल्ला अत्यंत दुर्दैवी आहे. गुरूकुलात हैदोस घालणाऱ्यांनी मुलांच्या मनात निर्माण केलेली भीती आणि दहशत पोलिस अधीक्षक नवनित कांवत यांच्या निदर्शनास येईल काय? आणि त्यांनी या घटनेची कठोर कारवाई करावी का नाही? असा सवाल डॉ. गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे.

## मांजरसुंबा महामार्ग पोलिसांनी सात लाखांचा गुटखा पकडला

**बीड । प्रतिनिधी**

धाराशिवहून बीडकडे येत असलेल्या एका पांढऱ्या पिकअपमधून जवळपास सात लाख रूपयांचा प्रतिबंधित गुटखा मांजरसुंबा महामार्ग सुरक्षा पथकाने जप्त केला आहे. या कारवाईत एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून, त्याचे तीन साथीदार पळून जाण्यात यशस्वी झाले. १० ऑक्टोबर २०२५ रोजी पहाटे ५:१५ वाजता पारगाव टोलनाक्याजवळ सहायक पोलीस निरीक्षक बालाजी ढगारे यांच्या पथकाने ही ▶ उर्वरित पान २ वर

## पुरग्रस्तांच्या नावाखाली उपस्थितांचं चांगभलं; मदतीच्या आडून शिरुरमध्ये गरिबांची थट्टा !

**शिरूर का. । प्रतिनिधी**

अतिवृष्टीमध्ये सिंदफणा नदीच्या महापूचे पाणी घरात शिरल्याने संसारपयोगी साहित्यासह अन्नधान्य वाहून गेले. मध्यरात्री अचानक आलेल्या महापूराने घरातील साहित्य सावरण्याचीही संधी दिली नाही, त्यामुळे अंगच्या कपड्याने जीव वाचवण्याच्या अंकताने घराबाहेर पडलेल्या शिरुर शहरातील पूरग्रस्तांच्या मदतीसाठी आज एका जिल्हा बाहेरील सेवाभावी संस्थेने किराणा किट, दप्तर यासह गरजु साहित्य वाटपाचे आयोजन करण्यात आले होते. प्रशासकिय अधिकार्यांच्या उपस्थितीत मोठ्या दिमाखात कार्यक्रमाचे सुरू झाला, स्टेज संवाद पोरख्यांनी थेट राज्यातील अतिवृष्टींवर मोठ-मोठ्या वल्गना केल्या. सर्वांचे मनोगत व्यक्त झाल्यानंतर किट वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये कार्यक्रमासाठी उपस्थित ज्यांचा म हापूराशी केवळ नेत्रदृष्टी पुरता संबंध असावा त्यांनीच अगोदर किटांवर डल्ला मारला. आयोजकांकडे प्रशासनकडील बाधीत, गरीब-गरजू, पूरग्रस्तांची यादी सोबत ▶ उर्वरित पान २ वर



*नवगण राजुरी :- येथील गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयास बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सदिच्छा भेट दिली असता त्यांचा सत्कार करताना प्राचार्य प्रशांत पवळ आदि.*

## जिल्ह्यानंतर विभागातही सोहम लांगोरेची 'चमकदार' कामगिरी: राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी बीडमधून निवड

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हास्तरीय स्पर्धेत 'पहिला' क्रमांक पटकावल्यानंतर, बीडचा सुपुत्र चि.सोहम अतुल लांगोरे याने विभागीय स्तरावरही आपल्या बुद्धिमत्तेची आणि कौशल्याची 'चमकदार' मोहोर उमटवली आहे.महाराष्ट्र युवक व क्रीडा संचालनालय व जिल्हा क्रीडा कार्यालय,बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय स्पर्धेत दैदिप्यमान यश मिळवल्यानंतर, चंपावती विद्यालयातील इयत्ता ९ वीत शिकणाऱ्या सोहमने शुकवार दि. १० ऑक्टोबर रोजी हिंगोली येथे



पार पडलेल्या छत्रपती संभाजीनगर विभागीय बुद्धिबळ स्पर्धेत १७ वर्ष वयोगटात 'द्वितीय' क्रमांक पटकावून आपल्या तयारीची साक्ष दिली आहे.या स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर,जालना, बीड, लातूर, परभणी, हिंगोली,नांदेड आणि धाराशीव या जिल्ह्यातील विजयी बुद्धिबळपटूचा समवेश होता.या महत्त्वपूर्ण कामगिरीमुळे सोहमने थेट राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेतील आपले स्थान दिमाखात निश्चित केले आहे. सोहम लांगोरे हा आंतरराष्ट्रीय 'फिडे' मानांकन (ऋखऊए ठरींशव) खेळाडू आहे. त्याचे 'फिडे रेटिंग' १६०० इतके प्रभावी आहे.बुद्धिबळ क्षेत्रातील सर्वोच्च समजल्या जाणाऱ्या 'ग्रँड मास्टर' किताबाच्या दिशेने त्याचा प्रवास सुरू आहे.त्याने अहिल्यानगर, सांगली,पुणे, संभाजीनगर, नाशिक,पाथर्डी, येडशी, धाराशिव,श्रीरामपूर आणि ▶ उर्वरित पान २ वर

## ऊस तोडणी व वाहतुकीची आगाऊ घेतलेल्या रकमेचा धनादेश वटला नाही म्हणून आरोपीस रक्कम रु. ५,००,०००/- रुपयाचा दंड व २ महिन्याची कारावासाची शिक्षा

**बीड । प्रतिनिधी**



ऊस तोडणी व वाहतुकीची आगाऊ घेतलेल्या रकमेचा परतफेडीचा खोटा धनादेश वटला नाही, प्रकरणी आरोपी नवनाथ भगवान घाडगे, रा. केतुरा, ता. बीड यास बीड येथील दुसरे अति. मुख्य न्यायदंडाधिकारी साहेब बीड यांनी रु. ५,००,०००/- रुपयेचा दंड व २ महिन्याची कारावासाची शिक्षा सुनावणी आहे. मौजे खापर पांगरी ता. बीड येथील श्री. संदिपान काशीनाथ शेंडगे यांचे कडुण सन २०१७/१८ च्या गळीत हंगामासाठी ऊस तोडणी व वाहतुकी पोटी आगाऊ उच्चल रक्कम ४,५०,०० रु आरोपी नवनाथ भगवान घाडगे यांनी घेतले होते, ती रक्कम परत करण्याचा धनादेश आरोपीचे खात्यात पुरेशी रक्कम शिल्लक नसल्यामुळे अनादरीत झाला, त्यामुळे फिर्यादीस रक्कम मिळाली नाही त्यानंतर नोटीस पाठवुनही रक्कम दिली नाही, म्हणुन फिर्यादीने कलम - १३८ नि.ई. ॲक्ट ▶ उर्वरित पान २ वर

# मोबाईलमुळे ८० टक्के लोक मनोरुग्ण झाले: समाजप्रबोधनकार ह.भ प.निवृत्ती महाराज इंदुरीकर



**आष्टी । प्रतिनिधी**

मोबाईलमुळे ८०टक्के लोक मनोरूग्ण आहेत. मोबाईलमुळे लोक वेडे झाले.हे कठोर परंतु वास्तववादी विधान केले. आधुनिक तंत्रज्ञानामुळे निर्माण झालेल्या मानसिक ताण,एकांत आणि व्यसनाधीनतेकडे तरुण जात आहेत.कमीपणा घ्यायची शिका म्हणजेच साधेपणा आणि संतोषाचा अंगीकार करावा. सेवेचा महिमा सर्व महाराज मंडळी पांडुरंगाचे गडी आहेत या ओळीतून त्यांनी सांगितले की,धर्मप्रसारक आणि संतजन हे केवळ ईश्वराचे सेवक आहेत, त्यांच्यात स्वत... चा अहंभाव नसतो. भक्ती ही वंशपरंपरेगत नाही परमात्मा हा रक्ताात असावा लागत नाही, असे म्हणत ह.भ.प.निवृत्ती इंदुरीकरण यांनी भक्ती ही कोणत्याही जात,कुल किंवा वंशापेक्षा वेगळी असून ती व्यक्तिगत अनुभवावर आधारित आहे. मोबाईलमुळे ८०टक्के लोक मनोरूग्ण झाले असल्याचे प्रतिपादन समाजप्रबोधनकार ह.भ प.निवृत्ती महाराज इंदुरीकर यांनी केले. आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथे सुरू असलेल्या सुवर्ण महोत्सवी अखंड हरिनाम सप्ताहाच्या सहाव्या दिवशी प्रबोधनकार ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर यांची कीर्तन सेवा संपन्न झाली.दुपारच्या चार ते सहा या वेळेत झालेल्या या कीर्तनात महाराजांनी संत तुकाराम महाराज यांचा एक अभंग घेऊन भक्ती, समाजस्थिती आणि आधुनिक जीवनशैलीवर खोलवर विचार मांडले. यावेळी इंदुरीकर महाराज म्हणाली की,सामूहिकता आणि आनंदाचे आवाहन: शेवटी, सप्ताह म्हणजे संघटन, हसत हसत जगा व शरीराचा चांगला उपयोग करा, या संदेशातून त्यांनी सामूहिक उत्सवाचे महत्त्व, आनंदी जीवनशैली आणि निरोगी शरीरातून परमेश्वराची सेवा करण्याचा संदेश दिला. महाराजांनी स्पष्ट केले की,भेंची सुरुवात ईश्वराकडे केलेल्या एकनिष्ठ प्रार्थनेपासून होते. जीवनातील सर्व आकांक्षा सोडून केवळ 'चित्त तुझ्या पायी राहावे' अशी विनंती हेच खरे तप आहे. भगवंताची बाहेर धरून (धरोनिया बाही) ▶ उर्वरित पान २ वर

## थोडक्यात...

### परळी ऐथिल आश्रमात झालेल्या घटनेचा शिवक्रांती सेना संघटनेच्या वतीने जाहीर निषेध विशाल इंगोले

**बीड । प्रतिनिधी**

परळी येथे बालकाश्रम शाळेत तेथे शिक्षण घेत असलेल्या लहान मुलांना बाहेरून येऊन अज्ञात व्यक्तींनी मारहाण केली व वारकरी संप्रदाय चे टाळ मृदंग व ईतर साहित्य याची तोड फोड करत नुकसान केले यावरच न थांबता त्या कोवळ्या मुलांना बैटिने अमानुष मारहाण करून जखमी केले बीडच्या परळी शहरात गुरुकुलात घुसून ११ विद्यार्थ्यांना बेल्ट व बांबूने जबर मारहाण ही अत्यंत धक्कादायक असुन नर्मदेश्वर गुरुकुलात अध्यात्माचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मारहाण करण दुर्दैवी आहे संबंधित आरोपीवर कठोर शासन होणे गरजेचे आहे असे शिवक्रांती सेना संघटनेचे बीड जिल्हा अध्यक्ष विशाल इंगोले यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

### १६ ऑक्टोंबर पासून शाळांना सुट्टी

**बीड । प्रतिनिधी**


शालेय शिक्षण विभागाने दिपावलीच्या सुट्ट्यांची आदीसूचना प्रसिध्द केली असून या शैक्षणिक वर्षे २०२५-२६ मध्ये दिपावलीसाठी १६ ऑक्टोंबर ते २ नोव्हेंबर या कालावधीमध्ये सुर्टट्या मिळणार आहेत. मात्र २ नोव्हेंबरला रविवार आल्यामुळे ३ नोव्हेंबरपासून शाळा नियमित सुरू होतील. या वर्षी २१ दिवसांऐवजी १७ ते १८ दिवसच दिपावलीच्या शैक्षणिक सुट्ट्या मिळणार आहेत. प्राथमिक शिक्षणाधिकारी आणि माध्यमिक शिक्षणाधिकारी या दोघांच्या संयुक्त स्वाक्षरीच्या पत्रकाने या सुटट्यांच्या आदीसूचना प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये १६ ऑक्टोंबर ते २ नोव्हेंबर असा या सुट२ट्यांचा कालावधी आहे. येत्या शैक्षणिक वर्षामध्ये किमान २३८ कार्यदिवस असले पाहिजेत उन्हाळी आणि दिवाळी अशा मिळून एकूण ७५ दिवस सुट्ट्याअसावेत असे ही या पत्रकात म्हंटलेले आहे. त्यामुळे सहाजिकच १५ ऑक्टोंबरपयरत इयत्ता १ ते १२ वी पयरत प्रथम सत्र परिक्षा पार पडणार आहेत.

### 'स्थानिक'च्या निवडणुकीसाठी आयोगाकडून मतदार यादी प्रसिध्द

**बीड । प्रतिनिधी**

एका महिनाभराच्या कालावधीच्या आतमध्ये नगरपालिका, जिल्हा परिषदआणि पंचायत समिती यांच्या निवडणूकीच्या संदर्भाने कोणत्याक्षणी आचारसंहिता आयोगाकडून घोषीत होवू शकते त्या अनुषंगाने ८ ऑक्टोंबर २०२५ रोजी प्रारूप मतदार यादी निवडणूक आयोगाने प्रसिध्दी केली आहे. या निवडणूकी आधी मतदाराला आपले न ाव शोधणे चुका दुरूस्त करणे एक संकेस्थळी प्रसिध्द करण्यात आलेले आहे. राज्य निवडणूक आयोगाने १ जुलै २०२५ हा अधिसूचित दिनांक ही मतदार यादी प्रसिध्द करतांना ग्राह्य धरला आहे. त्याच दिवशी अस्तित्वात असलेल्या विधानसभेची मतदार यादी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीसाठी वापरात येणार आहे. त्या आधारे करण्यात आलेल्या जि.प., नगर पालीका आणि पंचायत समिती यांचे प्रभाग, गट आणि निर्वाचन गण या साठी या प्रारूप मतदार यादीतून नाव शोधणे, मतदाराला सोपे होणार आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची प्रारूप मतदार यादीची छायांकित प्रत मतदाराला तहसिल कार्यालय आणि नगर पालिका, नगर पंचायत या ठिकाणी निश्चित केलेले शुल्क भरून ती मिळविता येणार आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाची जवळपास स्थानिक स्वराज्य संस्थानच्या निवडणुकीची तयारी केली असून मतदारांनी खालील संकेतस्थळावर भेट द्यावी.

### निमगाव मायंबा येथे श्री नवनाथ ग्रंथ पारायण व किर्तन महोत्सव

**बीड । प्रतिनिधी**

शिरूर कासार तालुक्यातील निमगाव मायंबा हे धार्मिक परंपरेसाठी प्रसिद्ध ठिकाण असून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी येथील श्री नवनाथ ग्रंथ पारायण व किर्तन महोत्सव मोठ्या भक्तीभावाने साजरा होणार आहे. या महोत्सवाची ही सलग २६ वी वर्षपूर्ती असून, ही अखंड परंपरा आजही तितक्याच श्रद्धा आणि उत्साहात जपली जात आहे. या सोहळ्याला वैकुंठवासी ह.भ.प. धोंडीराम महाराज यांच्या प्रेरणेने आणि वैराग्याची महामेरू गुरुवर्य स्वामी निगमानंद महाराज यांच्या आशीर्वादाने, तसेच ह.भ.प. महंत स्वामी जनार्दन महाराज मठाधिपती मच्छिंद्रनाथ गड निमगाव यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडण्यात येत आहे. बुधवार, दिनांक १५ ऑक्टोबर रोजी या महोत्सवाचा शुभारंभ होणार असून, २२ ऑक्टोबर रोजी काल्याचे कीर्तन आणि महाप्रसादाने याची सांगता होणार आहे. या आठवडाभर चालणाऱ्या धार्मिक कार्यक्रमात काकडा भजन, विष्णुसहस्रनाम पठण, गीता पारायण, भावार्थरामायण, हरिपाठ, हरिजागर आणि कीर्तन यांसारख्या अनेक भक्तिप्रवृत्तींचा समावेश आहे.

### सौ. के.एस.के. कनिष्ठ महाविद्यालयातील मुलींचा नेटबॉलचा संघ शालेय विभागीय स्पर्धेसाठी पात्र



**बीड । प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय नेटबॉल क्रीडा स्पर्धेत सौ. के.एस.के. कनिष्ठ महाविद्यालयाचा १९ वर्षाखालील मुलींच्या संघाने जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत प्रथम येण्याचा बहुमान पटकावला. या क्रीडा स्पर्धेत संघनायक तनुजा हाडुळे, गितांजली शेळके, ऋतुजा शिंदे, अनुराधा गायकवाड, गौरी राउत, अंकिता गावडे, शिवानी शिंदे, सायली बनसोडे, प्रगती तांगडे, आरती शेळके, सिध्दी कानडे, श्रुती ठोकळ या खेळाडू विद्यार्थीनींचा सहभाग होता. तसेच विभागीय स्पर्धेत बीड जिल्हयाचे प्रतिनिधीत्व करण्याचा बहुमान सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाला मिळवून दिला. या यशाबद्दल नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. योगेश क्षीरसागर, संस्थेच्या उपाध्यक्ष डॉ. दीपा क्षीरसागर, माजी नगराध्यक्ष डॉ. भारतभुषण क्षीरसागर, संचालक डॉ. सारीका क्षीरसागर, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे, डॉ. विश्वांभर देशमाने, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर, उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे, कमवि चे उपप्राचार्य नारायण काकडे, पर्यवेक्षक श्री जालिंदर कोळेकर, क्रीडा विभागप्रमुख डॉ. भागचंद सानप, अमृतसिंग बिसेन, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी यांनी खेळाडूंचे अभिनंदन करुन पुढील स्पर्धेस शुभेच्छा दिल्या.